"जनहिताय सर्वदा"

# महाराष्ट्र शासन

## मृद व जलसंधारण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**Email ID : jsa.wcd-mh@nic.in** **दूरध्वनी क्र. : २२८४६९७४**

क्रमांक: संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४०/जल-७. दिनांक : २२ ऑगस्ट, २०२५

प्रति,

**सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय समिती,**
**जलयुक्त शिवार अभियान २.०**

**विषय** :- जलयुक्त शिवार अभियान २.० योजनेंतर्गत समाविष्ट असलेल्या कामांचे **त्रयस्थ मूल्यमापन** करण्याबाबत.

**संदर्भ** :- मृद व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दि.०३ जानेवारी, २०२३

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयान्वये राज्यात जलयुक्त शिवार अभियान २.० राबविण्यात येते. सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र.८ मधील मुल्यमापन या शीर्षकामध्ये *"काम सुरु असताना समवर्ती मुल्यमापन करावे. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन करावे"* असे नमूद आहे.

२. त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते कि, जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत **विशेष निधी व अभिसरण** मध्ये समाविष्ट असलेल्या कामांचे **त्रयस्थ मूल्यमापन** खालील अटींच्या अधीन राहून करण्यात यावे.

i. **योजनेंतर्गत पूर्ण झालेल्या सर्व कामांचे त्रयस्थ मूल्यमापन करणे बंधन कारक राहील.**

ii. मूल्यमापनासाठी खालील संस्था पात्र राहतील.
   i. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये,
   ii. शासकीय पॉलिटेक्निक महाविद्यालये,
   iii. जलसंधारण कामांचा अनुभव असलेल्या स्वयंसेवी संस्था,
   iv. ISO मानांकित खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये

iii. मूल्यमापनासाठी उक्त नमुद केलेल्या त्रयस्थ संस्था निवडीचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय समिती जलयुक्त शिवार अभियान २.० यांना राहतील.

iv. योजनेतंर्गत काम करत असलेले सर्व शासकीय यंत्रणा (कृषी विभाग, जलसंपदा विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मृद व जलसंधारण विभाग, रोजगार हमी योजना, जिल्हा परिषद इत्यादी.) यांनी मुल्यमापनासाठी जिल्हाधिकारी यांनी निवड केलेल्या संस्था/ महाविद्यालय यांना आवश्यक माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. त्याबाबत सर्व यंत्रणांना जिल्हाधिकारी यांनी आदेशीत करावे.

v. मूल्यमापनासाठी निवड झालेल्या संस्थांनी खालील **तपासणी सूचीत** नमूद केलेल्या बाबींची माहिती मूल्यमापन अहवालात सादर करणे बंधनकारक राहिल.

| अ.क्र | तपासणी सूची | अ.क्र | तपासणी सूची |
|---|---|---|---|
| १ | जिल्ह्याचे नाव | १६ | मोजमाप पुस्तिकेत नोंदणी आहे का? |
| २ | तालुक्याचे नाव | १७ | वरिष्ठ अधिका-याकडुन कामाची तपासणी झाली आहे का? |
| ३ | गावाचे नाव | १८ | कामावर झालेला खर्च |
| ४ | पाण्याचा ताळेबंद आहे का? | १९ | लाभार्थी संस्था व तपशिल |
| ५ | कार्यान्वयीन यंत्रणेचे नाव | २० | कामामुळे निर्माण झालेला पाणीसाठा |
| ६ | कामाचे नाव व तपशिल | २१ | संरक्षित सिंचन क्षेत्र |
| ७ | जिओ टेग माहिती | २२ | कामाच परिणाम दर्शक छायाचित्रे |
| ८ | ग्रामसभा ठराव आहे का? | २३ | कामांची भौतिक स्थिती |
| ९ | तांत्रिक मान्यता किंमत व आदेश दिनांक | २४ | कामाची निरीक्षणे |
| १० | प्रशासकीय मान्यता किंमत व आदेश दिनांक | २५ | कामांची गुणवत्ता |
| ११ | कार्यरंभ आदेश दिनांक | २६ | अभियानापूर्वी अडवलेला अपधाव |
| १२ | निधी स्त्रोत: विशेष निधी/अभिसरण | २७ | अभियानानंतर उपलब्ध अपधाव |
| १३ | कंत्राटदाराचे नाव | २८ | अभियानापूर्वी भूजल स्थिती |
| १४ | काम पूर्ण झाल्याचा दिनांक | २९ | अभियानानंतर भूजल स्थिती |
| १५ | काम पूर्ण प्रमाणपत्र आहे का? | ३० | गाव जलपरिपुर्ण झाले का? |

३. मूल्यमापनासाठी निवड झालेल्या संस्था मूल्यमापन अहवाल जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय समिती जलयुक्त शिवार अभियान २.० यांना सादर करतील. सदर अहवालाच्या छाननीनंतर जिल्हाधिकारी यांनी शासनास स्वतंत्र पणे निधी मागणी करावी.

४. **योजनेतंर्गत समाविष्ट कामांवर झालेल्या खर्चाच्या १ टक्के पर्यत रक्कम त्रयस्थ मुल्यमापनासाठी अनुज्ञेय राहील.**

Digitally signed by
DEVENDRA PANDIT BHAMARE
Date: 22-08-2025 17:10:49

**( देवेंद्र भामरे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :-

१. सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय समिती, जलयुक्त शिवार अभियान २.०.